वसना उपसा सिंचन योजना, ता. कोरेगाव, जि. सातारा, द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा-२०१७/२३९/(प्र.क्र. ६६/१७)/ मध्यम प्रकल्प

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- १९ सप्टेंबर, २०१९.

संदर्भ: - १) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा निर्णय क्रमांक मकृखोविम /मप्र-३/२९९/(५४/२०००)/४१४२ दिनांक ०३/०५/२०००.

२) शासन निर्णय क्रमांक ०३०१/सा-७८३/ (२२६/२००१) मोप्र-१ दिनांक ११/०७/२००१.

३) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे पत्र क्रमांक मकृखोविम/३/(८४३/२०१५)/प्रशा-५/६९० दिनांक १४.०२.२०१७.

४) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्रमांक व्यअस-२०१९/प्र.क्र.२७/अर्थ-२ दिनांक १०/०६/२०१८.

प्रस्तावना:-

वसना उपसा सिंचन योजना, ता. कोरेगाव, जि. सातारा , या प्रकल्पांतर्गत कृष्णा प्रकल्पाच्या धोम डाव्या कालव्यामधून (कि.मी.४१, सा क्र. ४०/०३०) दोन टप्प्यात १७० मी. उंचीपर्यंत पाणी उचलून सातारा जिल्हयामधील कोरेगाव तालुक्यातील एकूण ४८६० हेक्टर्स क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यात येणार आहे.. सदर प्रकल्प महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत "उर्वरित महाराष्ट्र" या प्रदेशात आहे.

वसना उपसा सिंचन योजना, ता. कोरेगाव, जि. सातारा या प्रकल्पास संदर्भ क्रमांक १ नुसार सन १९९८-९९ चे दरसूचीवर आधारीत रूपये ३४.८८ कोटी इतक्या रकमेस मूळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर संदर्भ क्रमांक २ नुसार सन १९९९-२००० चे दरसूचीवर आधारीत रूपये ९४.६४ कोटी इतक्या रकमेस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती.

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांनी संदर्भ क्रमांक३ अन्वये डिसेंबर २०१४ च्या भाववाढ निर्देशांकावर आधारीत रुपये १५०.९६कोटी किंमतीचा द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मान्यतेस्तव शासनास सादर केला आहे. या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासनाच्या या निर्णयाव्दारे वसना उपसा सिंचन योजना, ता. कोरेगाव, जि. सातारा डिसेंबर २०१४ च्या भाववाढ निर्देशांकावर आधारीत रुपये १५०.९६कोटी किंमतीच्या द्वितीय सुधारित प्रकल्प अहवालास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी रूपये १३५.५० कोटी कामाप्रित्यर्थ व रुपये १५.४६कोटी अनुषंगिक खर्चासाठी तरतूद आहे. उपशीर्ष निहाय तरतुदींचा गोषवारा सोबत जोडण्यात येत आहे.

२. या योजनेस प्रदान केलेली द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता मध्यम प्रकल्प कार्यासनाच्या नोंदवहीमध्ये अनुक्रमांक ९/२०१९ वर नोंदवण्यात आली आहे.

३. सदर प्रकल्पाचे उर्वरित काम नियोजित वेळेत व सुधारित प्रशासकीय मान्यता तरतुदीच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावे.

४. या प्रकल्पाच्या कामावर होणारा खर्च मुख्य लेखाशीर्ष ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधा-यावरील भांडवली खर्च, -मध्यम पाटबंधारे प्रकल्प- वसना उपसा सिंचन योजना(योजनांतर्गत) या लेखाशिर्षाखाली खर्च टाकावा व त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

५.१) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालातील मुद्दा क्र. १ ते २७ मधील निरीक्षणांची पूर्तता करावी.

५.२) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय प्रकल्पात समावेश करू नये.

५.३) प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावी. पाणीसाठ्याचा सिंचनाकरिता जास्तीत जास्त लाभ होईल अशाप्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे / निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

५.४) संपूर्ण लाभक्षेत्रामध्ये पाणी वापर संस्था स्थापन करुन सिंचन व्यवस्थापन पाणी वापर संस्थेस हस्तांतरित करावे.

५.५) सदर सुधारित प्रशासकीय मान्यतेमुळे प्रकल्प कार्यान्वयीकरण्याच्या विविध टप्यावर झालेल्या अनियमितता नियमित केल्या आहेत असे म्हणता धरता येणार नाही.

६. सदर शासन निर्णय, नियोजन विभाग (कार्यासन १४३४) , अनौपचारीक संदर्भ क्रमांक १०३/का.१४३४ दिनांक१०/०८/२०१७, वित्त विभाग (कार्यासन व्यय-१२) , अनौपचारीक संदर्भ क्रमांक २७६/व्यय-१२, दिनांक २९/११/२०१८ व संदर्भीय पत्र क्रमांक ४ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या व्यय- अग्रक्रम समितीच्या दिनांक २७/०५/२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९१९१२५३३५२९२७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, serialNumber=8a9bdce987e31fe4e079969a0eb71bce94df0f9984bd752cc203bcd86349bbb5, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2019.09.19 16:25:45 +05'30'

सहपत्र :- उपशीर्षनिहाय तरतुदींचा गोषवारा

(म.ई.धरणे)
शासनाचे उप सचिव

प्रत, सहपत्रांसह :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

९) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.
१२) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
१३) मुख्य अभियंता (द.व प्र) व सहसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) मुख्य अभियंता(विप्र), जलसंपदा विभाग, पुणे.
१५) उपसचिव (मो.प्र-१/ मो.प्र-२/जसं/निवसं/सिंव्य/लाक्षेवि/लपा/जवि),यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) आंतरवित्त सल्लागार व उपसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा.
१८) कार्यकारी अभियंता, धोम कालवे विभाग क्र. २, सातारा.
१९) वित्त विभाग (व्यय-१२/ अर्थ-०२/अर्थ-१०/व्यय-६ अ), मंत्रालय, मुंबई.
२०) नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई.
२१) मध्यम प्रकल्प कार्यासन संग्रहार्थ.

वसना उपसा सिंचन योजना, ता. कोरेगाव, जि. सातारा

उपशीर्ष निहाय तरतुदींचा गोषवारा

शासन निर्णय क्र. सुप्रमा-२०१७/२३९/(प्र.क्र.६६/१७)/ मध्यम प्रकल्प दिनांक १९/०९/२०१९ चे सहपत्र.

(किंमत रुपये कोटी)

उपशिर्ष	द्वितीय सुप्रमानुसार तरतूद
अ) शीर्षकामे	
अे - प्राथमिक	०.००
बी - भूसंपादन	०.२४
सी -कामे	६३.०२
आर - दळणवळण	०.००
एकूण (अ)	**६३.२६**
ब) कालवे व वितरण व्यवस्था	
अे - प्राथमिक	०.००
बी - भूसंपादन	१.८५
सी -कामे	७०.३९
एफ- आरएचटी वर्क्स	०.००
जी- पूल	०.००
के- इमारती	०.००
एल- मातीकाम	०.००
आर - दळणवळण	०.००
यू- वितरिका	०.००
एकूण (ब)	**७२.२५**
एकूण कामे	**१३५.५०**
आस्थापना, संयंत्रे व इतर खर्च	१५.४६
प्रकल्पाची एकूण किंमत	**१५०.९६**